# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या ई-निविदेतील कमी दराला प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन मध्ये १२० एच पी क्षमतेचे ४ सबमर्सिबल पंप अस्तित्वात आहेत परंतू सदर सबमर्सिबल पंप, पंपाची केबल व त्याचे पॅनल संपूर्ण खराब झालेले असून नादुरुस्त आहे. सदर कारणाने अजयनगर पंपींग स्टेशन येथे येणारे सांडपाणी काटई येथील मलप्रक्रिया केंद्र येथे पंपींग करणेस अडथळा निमार्ण झालेली आहे. या पूर्वी सदर पंपींग स्टेशनचे कोणत्याही प्रकारचे पंप दुरुस्ती काम केलेले नसल्याने सदर पंपाचे रिवाईंडींग, ओव्हरहॉलींग, नादुरुस्त झालेल्या केबल्स् व पॅनल बोर्ड दुरुस्ती व नव्याने बसविल्यानंतर पंपींग स्टेशन कार्यान्वित करता येऊ शकेल, सदर काम करणे अत्यंत तातडीचे व आवश्यक आहे.

अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबत रु. ३०,५०,०३४/- मात्रची ई-निविदा सुचना क्र. ५२ दि.१८/१०/२०२२ ते १६/११/२०२२ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व दै. लोकमत व खबरे आजतक या वृत्तपत्रात पसिध्द करण्यांत आली होती. दिनांक १८/११/२०२२ रोजी ई-निविदा निविदा समिती समोर उघडली असता एकूण ३ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| | **अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या** | **रु. ३३,५०,०३४/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सदर कामा करीता प्राप्त ई निदेतील निविदाकारांनी ऑनलाईन सादर केलेले कागदपत्रांची पडताळणी करून उक्त निविदाकारांपैकी आविर्षा इलेक्टीकल्स या निविदाकारांने निविदा नोटीसमध्ये नमूद अटी शर्तीनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांना अपात्र ठरवून उर्वरित दोन निविदाकारांचे प्राईजबिड उघडण्यात आले असता हर्षल टेकनिक्स या निविदाकारांची निविदा कमी दराची परंतू अंदाजपत्रकापेक्षा ९.६० टक्के जास्त दराची असल्यामुळे ठेकेदारास निविदेतील दर कमी करणेकामी जा.क्र. भिनिशमनपा/पापुवि/१९२७ दि. १२/१२/२०२२ रोजीच्या पत्रानुसार वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले होते. वाटाघाटी अंति हर्षल टेकनिक्स यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने म्हणेजेच रक्कम रु. ३३,५०,०३४/- मात्र मध्ये कराण्याची तयारी दर्शविलेली असून तसे पत्र सादर केले आहे. हर्षल टेकनिक्स यांना अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्र.** 80 **दिनांक :-** 14/02/**२०२३**

अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाच्या अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

o/c